सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
पुणे शहर विभागीय क्रीडा समिती,
व्दारा. वाय ॲण्ड एम अंजुमन खैरुल इस्लाम संचलीत
पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, कॅम्प, पुणे-१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६४५४२४०/२६४४६३१९ Website: www.pczsc.in

प्राचार्य डॉ. आफताब अन्वर शेख
अध्यक्ष

प्राचार्य डॉ. शोभा इंगवले
कार्याध्यक्ष

प्रा. डॉ. अयाज हुसेन शेख
सचिव

## आंतर महाविद्यालयीन डेव्हीड करंडक (क्रिकेट) मुले स्पर्धा

# स्पर्धा नियम

०१) आंतर महाविद्यालयीन डेव्हीड करंडक (क्रिकेट) मुले स्पर्धा बाद पद्धतीने घेण्यात येतील.

०२) स्पर्धा पुणे शहर विभागीय क्रीडा समिती संलग्न महाविद्यालयांसाठी घेण्यात येतील .

०३) क्रिकेट स्पर्धेसाठी पांढरा गणवेश व स्पोर्टस् शुज अनिवार्य आहे.

०४) उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) पर्यंतचे सामने २० षटकांचे असतील. उपांत्यफेरी, अंतीम सामना, तीसऱ्या व चौथ्या क्रमांकाचे सामने ४० षटकांचे असतील. परंतू अपरिहार्य कारणामुळे षटकांची मर्यादा कमी जास्त करण्याचा अधिकार आयोजन समितीला राहील.

०५) सामन्यांच्या वेळा:**२० षटकांसाठी**

**पहिला सामना :**

| | |
|---|---|
| पहिला डाव | ०९.३० ते ११.०० |
| दुसरा डाव | ११.१५ ते १२.४५ |

**दुसरा सामना :**

| | |
|---|---|
| पहिला डाव | ०१.३० ते ०३.०० |
| दुसरा डाव | ०३.१५ ते ०४.४५ |

०६) सामन्यपूर्वी ३० मिनिटे अगोदर संघ उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

०७) २० षटकांच्या सामन्यात एक गोलंदाज जास्तीत जास्त ०४ षटके गोलंदाजी करेल तसेच ४० षटकांच्या सामन्यासाठी एक गोलंदाज जास्तीत जास्त ०८ षटके गोलंदाजी करेल. जर षटकांच्या संख्येत काही कारणामुळे बदल झाला तर सदर षटकांच्या १/५ (२० टक्के) एक गोलंदाज गोलंदाजी करेल.

०८) ४० षटकांसाठी - वेळा ०९.३० ते १२.३० (पहिला डाव)
०१.०० ते ०४.०० (दुसरा डाव)

३० यार्ड नियम स्पर्धेसाठी लागू आहे.

कृपया मागे पहा ...२...

०९) **पावर प्ले:**

सामना ४० षटकांचा असेल तर सुरूवातीची १२ षटके.

सामना २० षटकांचा असेल तर सुरूवातीची ०६ षटके.

जर षटकांच्या संख्येमध्ये बदल झाल्यास पावर प्ले बाबतचे अधिकार आयोजन समिती व पंचांना असतील.

१०) पावसामुळे किंवा नैसर्गीक आपत्तीमुळे सामना उशीरा सुरु झाल्यास षटकांची संख्या कमी करण्यात येईल त्याप्रमाणात गोलंदाजांच्या षटकांची संख्या कमी होईल.

११) सामन्यापूर्वी संघाची उपस्थिती ३० मिनिटांपूर्वी असावी अन्यथा संघास बाद करण्यात येईल व त्या संघाकडून रक्कम J १०००/- (रूपये एक हजार फक्त) दंड आकारण्यात येईल.

१२) क्षेत्र रक्षण करणाऱ्या संघाने त्यांना नमूद केलेला निर्धारित वेळेत त्यांची षटके जर पूर्ण केली नाहीत तर पंचानी तो डाव निर्धारित वेळेत थांबवावा व त्यानंतरचा फलंदाजी करणाऱ्या संघास तेवढीच षटके खेळण्यास द्यावीत.

१३) नैसर्गिक अथवा अपरिहार्य कारणामुळे व्यत्यय आल्यानंतर सामना निकालाबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येईल:

प्रथम फलंदाजी करणारा संघ पूर्ण षटके खेळला किंवा मर्यादित षटके होण्यापूर्वीच सर्व फलंदाज बाद झाले असतील तर विरूद्ध संघास कमीत कमी १/३ (म्हणजेच ४० षटकासाठी १४ षटके, २० षटकासाठी ०७ षटके तसेच १५ षटकासाठी ०५ षटके) फलंदाजी होणे आवश्यक आहे. ४० किंवा २० षटकांप्रमाणे सरासरी काढून दुसऱ्या संघास १४ किंवा ७ ष्टकांचे टार्गेट दिले जाईल. जर दुसरा डाव सुरू असताना १४ किंवा ७ षटके पूर्ण होण्या अगादेरच काही अपरिहार्य कारणांस्तव सामना थांबवावा लागला आणि त्यावेळी सदर संघाने १४ किंवा ७ षटकांचे टार्गेट पूर्ण केले असेल तर तो संघ विजयी होईल आणि टार्गेट पूर्ण केले नसेल तर तो सामना परत खेळविला जाईल(थांबलेला सामना त्याच दिवशी पुढे चालू करायचा असेल तर मैदानाची परिस्थिती पाहून पंच योग्य तो निर्णय घेतील).

उदा. ४० षटकांच्या सामन्यामध्ये पहिला संघ ३० षटकामध्ये सर्वबाद २०० धावा झाल्या. पहिल्या डावाची सरासरी २००/४० = ५ अशी राहील.

तसेच दुसरा डावाच्या संघास १४ षटकांत ७१ धावांचे (१४ × ५) टार्गेट असेल.

१४ षटकांपूर्वीच ७१ धावा पूर्ण केल्यास तो संघ विजयी होईल. तसेच १४ षटकांच्या आत अपरिहार्य कारणास्तव सामना थांबला आणि ७१ धावा झाल्या नसतील तर तो सामना परत घेतला जाईल.

कृपया मागे पहा...३...



दुसऱ्या डावामध्ये किमान षटकांपेक्षा जास्त षटके झाल्यास (म्हणजे १८ षटके) व सामना अपरिहार्य कारणामुळे थांबला तर सदर संघाचा स्कोर ९१ असणे आवश्यक आहे. (१८×५=९० ).

उदा. पहिला संघ २० षटकांत १०० धावा (सरासरी ५ धावा) सामना थांबलेला
दुसरा संघ १० षटकांत ५१ धावा (सरासरी ५.१ धावा) फरक व रन

या ठिकाणी दुसरा संघ विजयी घोषित करावा. वरील निर्णय घेतांना सरासरी समान असल्यास एक सुपर ओव्हर त्याच दिवशी अथवा पुढील वेळेनुसार घेण्यात यावी.

१४) स्पर्धेसाठी फक्त कोहिनूर, तलेसिया अथवा एस.जी. या ब्रँडचेच चेंडू वापरण्यात यावेत.

१५) दोन्ही डाव पूर्ण झाल्यास. दोन्ही संघांची धावसंख्या समान झाल्यास ज्या संघाचे कमी फलंदाज बाद झाले असतील त्या संघास विजयी घोषीत करण्यात यावे. जर दोन्ही संघांची धावसंख्या व विकेट समान असतील तर सुपर ओव्हर चा नियम अंमलात येईल.

१६) सामन्यांच्या वेळी स्वत:चे स्कोअर बुक, सर्व खेळाडूंचे ओळखपत्र व संघ व्यवस्थापक असणे अनिवार्य आहे.

१७) स्पर्धेतील प्रथम सामन्यांपूर्वी पात्रता फॉर्म जमा करावेत. त्यावेळी दिलेल्या १६ खेळाडूमधूनच आपला संघ प्रत्येक सामन्यात निवडला गेला पाहिजे. फॉर्म जमा झाल्यानंतर खेळाडू बदलता येणार नाही.

१८) पंचाचा निर्णय अंतिम असेल.

१९) खेळाडूंनी मैदानावर गैरवर्तन केल्यास पुणे शहर विभागीय क्रिडा समितीने निर्णय दिल्याशिवाय त्या खेळाडूस अगर संघास पुढील सामन्यात खेळता येणार नाही.

२०) स्पर्धेतील सामन्यांच्या वेळ व मैदानात बदल करण्याचा अधिकार संयोजन समितीस राहील.

**डॉ. शेख अयाज**
आंतर विभागीय सचिव